**वाचा -** १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे कडिल आदेश जा.क्र.आरोग्य/आस्था-३/१४१/२०१७ नाशिक दिनांक ०८/०५/२०१७

२) मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे कडिल कार्यमुक्त आदेश जा.क्र.आरोग्य/आस्था-३/९५४/२०१७ दिनांक १२/०९/२०१७

३) वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र.तळेघर,ता.आंबेगांव,जि.पुणे यांचे कडिल कार्यमुक्त आदेश क्र.आरोग्य/आस्था/१११/२०१७ दिनांक २९/०९/२०१७

४) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांची मंजुर टिपणी दिनांक - ६/११/२०१७

---

## आदेश

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक,**
**आरोग्य विभाग,**
**जा.क्र.आरोग्य/आस्था-३/**३९६/२०१७
**नाशिक, दिनांक:-** ७/११/२०१७

उपरोक्त वाचा क्र. १ दिनांक ८/०५/२०१७ अन्वये श्री. नितीन पुंजाराम पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रा.आ.केंद्र.तळेघर, ता.आंबेगांव,जि.पुणे यांना एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने नाशिक जि.प.मध्ये सामावून घेणेबाबत आदेश पारीत करणेंत आले होते. श्री. नितीन पवार यांनी जि.प.मुख्यालय (आरोग्य विभाग) हजर व्हावे. त्यानंतर त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रावर पदस्थापना देण्यांत येईल असे आदेश देण्यांत आले होते. त्यानुसार वाचा क्रमांक २ येथील दि.१२/९/२०१७ चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि.प.पुणे यांचे कडिल कार्यमुक्त आदेशानुसार श्री.पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र.तळेघर, ता.आंबेगांव जि.पूणे यांचे वाचा क्रमांक ३ चे आदेशान्वये दिनांक २९/०९/२०१७ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे. श्री. पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ हे दिनांक ३०/९/१७ दसरा सार्वजनिक सुट्टी दि.१/१०/१७ रविवार सुट्टी, आणि दि.२/१०/२१७ महात्मा गांधी जयंती सार्वजनिक सुट्टी असल्याने सुट्टया संपल्यानंतर दिनांक ०३/१०/२०१७ रोजी जि.प.मुख्यालयात (आरोग्य विभाग) येथे हजर झाले आहेत.

**श्री. पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ हयांना नाशिक जिल्हा परिषदेत, प्राथमिक आरोग्य केंद्र. तळेगांव ता. दिंडोरी येथे पदस्थापना देणेत येत आहे.** वाचा क्रमांक १ मधील आदेशातील अटी शर्ती कायम राहतील.

श्री. पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, यांचे वेतन व भत्ते जिल्हा परिषद कार्यालयांत हजर झाल्याच्या दिनांकापासुन काढण्यात यावेत. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

सदर आदेशाची नोंद श्री. नितीन पुंजाराम पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, यांचे मुळसेंवा पुस्तकात घेणेत यावी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रत - योग्य त्या कार्यवाहीस्तव व माहीतीस्तव रवाना . . . . .**

१) श्री. नितीन पुंजाराम पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रा.आ.केंद्र.तळेगांव, ता. दिंडोरी.
२) गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, दिंडोरी.
३) तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी.
४) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र. तळेगांव, ता. दिंडोरी.
५) मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग, जि.प.नाशिक.
६) अस्थापना क्लर्क / बील क्लर्क.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**